# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION

**SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS**
**SENIOR SECONDARY| CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL**
**PRE BOARD-III EXAMINATION 2024-25**
**MARATHI**

Class : X                                        Duration : **3** Hrs
Date : 17.01.2025                                Max. Marks : **80**

Admission No.:                                   Roll No.:

---

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**
(1) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.
(2) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## विभाग (अ) वाचन व आकलन गुण (15)

**प्र 1 :– (आकलन ) अः अपठित गद्यांश :–**

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती'उक्तीप्रमाणे या जगातील समाजातील सर्वच लोकांचा उद्धार व्हावयाचा असेल तर संतांना, समाज सुधारकांना जन्म घ्यावा लागतो. त्यांना आपले आयुष्य जगाच्या कल्याणासाठी खर्च करावे लागते. महात्मा फुले हे त्यातलेच एक थोर विचारवंत आणि समाजसुधारक होते. वाहत्या प्रवाहा बरोबरच लाकूड,ओंडके,पालापाचोळा आणि मृत जनावरे वाहत असतात. पण प्रवाहाच्या विरूध्द दिशेने मासे पोहत असतात. याच सिध्दांतावर आधारित फुल्यांचे जीवन होते. तत्कालीन परिस्थिती अनुकूल नसतानाही नव्या कल्पना समाजासमोर मांडल्या आणि त्या समाजाला स्वीकारायला भाग पाडले .

अठराव्या शतकाच्या पूर्वाधात म्हणजे 1827 साली पुण्यात जन्मलेल्या फुल्यांनी जातिव्यवस्था व वर्णव्यवस्थेवर कडकडून हल्ला केला. जोपर्यंत समाजातील जातिव्यवस्था आणि वर्णव्यवस्थाचा बिमोड होत नाही तोपर्यंत समताधिष्ठित समाजव्यवस्थेची निर्मिती होणे अशक्य आहे असा विचार त्यांनी परखडपणे मांडला अशी भूमिका मांडणारे ते पहिले भारतीय होते.

त्याकाळी समाज अज्ञान,अंधश्रध्दा,अनिष्ठ प्रथा, केशवपन यांसारख्या भयानक विकृतीने ग्रासला होता. स्त्रियांना दुय्यम स्थान होते त्यांचे स्वातंत्र हिरावून घेतल्यामुळे गुलामगिरीचे जीवन जगावे लागत असे. फुल्यांनी तत्कालीन समाजाचे अवलोकन केले आणि स्त्रीच्या आणि अस्पृश्यांच्या उद्धारासाठी आयुष्य वेचण्याचे ठरविले वयाच्या अवघ्या 21 व्या वर्षी म्हणजे 1847 साली मुलींसाठी पुण्यात पहिली शाळा काढली.महात्मा फुल्यांनी स्वतःच्या पत्नीला म्हणजे सावित्रीबाई फुले यांना साक्षर करून मुलींच्या शाळेवर शिक्षिका म्हणून नेमणूक केली. त्याच्या कार्य प्रेरणेतून सावित्रीबाई फुले भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका ठरल्या.

**प्र 1 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा –** **(4X1=4)**

1 प्रवाहाच्या विरूध्द दिशेने पोहत असतात .
**अ** पालापाचोळा **ब** मासे
**क** ओंडके **ड** लामूड

2 मुलींसाठी पुण्यात पहिली शाळा कोणी काढली ?
**अ** सावित्रीबाई फुले **ब** लोकमान्य टिळक
**क** न्या.रानडे **ड** महात्मा फुले

3 भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका कोण होत्या?
**अ** लक्ष्मीबाई टिळक **ब** पंडिता रमाबाई

**क** सावित्रीबाई फुले **ड** आनंदीबाई जोशी

4 त्या काळी समाजात स्त्रियांना कसे स्थान होते?

**अ** दुय्यम **ब** मानाचे

**क** अभिमानाचे **ड** चांगले

**प्र 1 (ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन) (3X1=3)**

1 संत समाज सुधारकांचा जन्म कशासाठी असतो ?

2 महात्मा फुले यांना समाजात कोणती गोष्ट हवी होती ?

3 वरील उता–यामध्ये कोणती उक्ती आली आहे ?

4 महात्मा फुले कोणत्या साली जन्मले ?

**प्र 1(क) उता–याच्या आधारे खालील प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा :–(कोणताही एक) (1X2=2)**

1 महात्मा फुले यांनी स्त्रियांच्या व अस्पृश्यांच्या उद्धारासाठी आयुष्य वेचण्याचे का ठरवले ?

2 महात्मा फुले यांनी शिक्षण क्षेत्रात केलेले कार्य सांगा ?

**प्र 2:– (आकलन ) अः– अपठित पद्यांश :–**

बाळ,चाललास रणा
घरा बांधिते तोरण
पंचप्राणाच्या ज्योतींनी
तुज करिते औक्षण

याच विक्रमी बाहुनी
स्वतंत्रता राखायची,
खांदयावरी या विसावे
शांति उदयाच्या जगाची

म्हणुनिया माझ्या डोळा
नाही थेंबही दुःखाचा
मीही महाराष्ट्र कन्या
धर्म जाणते वीराचा

नाही एकटी हुंदका
मुखावाटे काढणार
मीच लावुनि ठेवली
तुझ्या तलवारीला धार

अशुभाची सावलीही
नाही पडणार येथे
अरे मी सांगते ना
जिजा–लक्ष्मींशी नाते

तुझ्या शस्त्रांना,अस्त्रांना
शक्ती देईल भवानी
शिवरायांचे स्वरूप
आठवावे रणांगणी

धन्य करी माझी कूस
येई विजयी होऊनी
पुन्हा माझ्या हाताने
दूधभात भरवीन !

**प्र 2 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा :– (कोणतेही तीन) (3X1=3)**

**1** रणांगणावर जाणा–या बाळासाठी आईने कोणती कृती केली?

**अ** पाय धुतलें **ब** दूधभात दिले

**क** पंचप्राणाच्या ज्योतीने औक्षण केले **ड** यापैकी नाही

**2** रणांगणावर कोणाचे रूप आठवावे असे आई म्हणते ?

**अ** संभाजींचे **ब** तानाजींचे

**क** शिवरांचे **ड** जिजाऊचे

**3** आईने कशाला धार लावून ठेवली आहे ?

**अ** तलवार **ब कु–हाड**

**क** भाला **ड** सुरा

**4** आई कुणाशी नाते सांगत आहे ?

**अ** बहिणाबाईशी **ब** लक्ष्मीबाईशी

**क** जिजाबाईशी **ड** जिजा–लक्षुमींशी

**प्र 2 (ब) एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** आई कोणता धर्म जाणते ?

**2** आईची कूस कशी धन्य होईल ?

**3** रणांगणावर जाणा–या बाळाच्या शस्त्रांना कोण शक्ती देईल ?

**4** आई स्वतःला कोणाची कन्या मानते ?

**विभाग :– ब ( 20 गुण)**

**प्र 3 (अ) सुचनेप्रमाणे उत्तरे लिहा :– (कोणतेही चार)** **(4X1=4)**

**1** खालील पैकी सामान्य नामाचा योग्य पर्याय कोणता ?

**अ** गंगा **ब** नदी

**क** कासारी **ड** यमुना

**2** विठोबाचे हात <u>कमरेवर</u> आहेत .(अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

**अ** क्रियाविशेषण अव्यय **ब** विशेषण

**क** शब्दयोगी अव्यय **ड** सर्वनाम

**3** <u>भिका–याला मी एक सदरा दिला,–––त्याला जेऊ घातले.</u>(रिकाम्या जागी योग्य उभयान्वयी अव्यय भरा )

**अ** परंतु **ब** पण

**क** शिवाय **ड** म्हणून

**4** मी त्याला मारले,म्हणून त्याने मला स्वतःहा मारले. या वाक्यात किती सर्वनामे आहेत.

**अ** चार **ब** सहा

**क** तीन **ड** पाच

**5** <u>काही</u> पक्षी उडू शकतात .( आधोरेखित शब्दाची जात ओळखा)

**अ** विशेषण **ब** क्रियापद

**क** क्रियाविशेषण अव्यय **ड** सर्वनाम

**प्र 3 (ब) काळ ओळखा व बदला ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** खालीलपैकी कोणते वाक्य भूतकाळातील आहे ?

**अ** बाबा समाज सुधारक होते. **ब** बाबा समाज सुधारक असतील

**क** बाबा समाज सुधारक होतील. **ड** बाबा समाज सुधारक आहेत.

**2** मला भुतांची भीती वाटते. (काळ ओळखा )

**3** मुलाने पुस्तक वाचले आहे. (भविष्यकालिन वाक्य तयार करा )

**4** कन्याकुमारी हे एक सुंदर स्थान आहे.(काळ ओळखा)

**प्र 3 (क)सुचनेप्रमाणे उत्तरे लिहा :–( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** 'तू फार चतुर आहेस.'या वाक्याचे उद्‌गारार्थी वाक्य कोणते ?

**अ** किती चतुर आहेस तू! **ब** छान चतुर! आहेस तू.

**क** फार चतुर आहेस !तू **ड** आहेस तू!चतुर फार

**2** तू खाली बस. ( या वाक्याचा प्रकार ओळखा)
**3** राजू खूप जबाबदार आहे ( नकारार्थी करा )
**4** अपमान केल्यास कोणाला राग येत नाही ?(वाक्याचा प्रकार ओळखा)

**प्र 3 (ड) समानार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** समानार्थी शब्दाची योग्य जोडी कोणती ?
**अ** –हास–अवधान **ब** –हास–नाश **क** –हास–स्मरण **ड** –हास–सन्मान
**2 विस्तव** या शब्दाचा समानार्थी शब्द निवडा
**अ** –मोफत **ब** –अस्त **क** –आग **ड** –अविस्तव
**3** समानार्थी शब्दानुसार गटात न बसणारा शब्द कोणता ?
**अ** –सूर्य **ब** –चंद्र **क** –भास्कर **ड** –दिनकर

**प्र 4 (अ) विरुध्दार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** विरूध्दार्थी शब्दाची योग्य जोडी कोणती ?
**अ** –आशा –निराशा **ब** – कठोर–कठीण
**क** स्वार्थ –निस्वार्थी **ड** –सोय–हरसोय
**2** सुंदर या शब्दाचा विरूध्दार्थी शब्द निवडा :–
**अ** –अतिसुंदर **ब** –रूपवान **क** –कुरूप **ड** –सालस
**3 अबोल** या शब्दाचा विरूध्दार्थी शब्द निवडा :–
**अ** –मुका **ब** –बोलका **क** –मूक **ड** –बधीर

**प्र 4 (ब) लिंग बदला ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** भिन्नलिंगी शब्दाचा पर्याय ओळखा :–
**अ** दोरखंड **ब** दोरी **क** दोर **ड** दोरा
**2** खालील पैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?
**अ** पगडी **ब** फेटा **क** टोप **ड** मुकुट
**3** खालील पैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?
**अ** प्रवाह **ब** नाला **क** नदी **ड** ओहळ

**प्र 4 (क) वचन बदला ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** टीकांची वाक्ये माझ्या कानावर येऊ लागली. ( अधोरेखित शब्दाचे वचन बदलून लिहा)
**2** यंत्र – या शब्दाचा अनेकवचनी शब्द लिहा.
**3** तारीख – या शब्दाचा अनेकवचनी शब्द लिहा.

**प्र 4 (ड) समास ओळखा ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** पुढील शब्दाचा समास ओळखा – शुभाशुभ
**अ** इतरेतर द्वंद्व **ब** द्विगु
**क** समाहार द्वंद्व **ड** वैकल्पिक द्वंद्व
**2** ज्या समासाचा विग्रह करताना आणि,व या उभयान्वयी अव्ययांचा वापर केला जातो त्या समसास ––––––समास म्हणतात.
**अ** अव्ययीभाव **ब** द्विगु
**क** समाहार द्वंद्व **ड** वैकल्पिक द्वंद्व
**3** खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता –
**अ** बेताल **ब** दशादिशा
**क** बेसावध **ड** आजन्म

**विभाग–क पाठयपुस्तक आधारित (30 गुण)**

**प्र 5 (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** पंत कोणती नोकरी करत होते ?
**2** उर्जाशक्तीचा जागर हा पाठ कोणत्या पुस्तकातून घेण्यात आला आहे ?

3 शालीच्या वर्षावामुळे कोणाची शालीनता हरवली नाही ?

4 स्नेहलने कोणता निश्चय केला?

**प्र 5 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा (कोणतेही तीन) (3X1=3)**

1 आंब्याच्या झाडाखाली असलेल्या ------अब्दुल बसला .

2 हल्ली मी वनज आणि ---- या दोन्हीं गोष्टींची चिंता करायचे सोडून दिले आहे.

3 अभ्यासाला --- वातावरण नव्हते. मात्र त्याही वातावरणात मी जिद्दीने अभ्यास करत राहिलो.

4 एवढा मोठा अपघात निरंजनच्या ------टळला.

**प्र 5 कः– खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहाः– (1X3=3)**

1 प्रवासवर्णनाची वैशिष्टये कोणती ?

2 निरंजन हाच खरा नागरिक हे तुमच्या शब्दात स्पष्ट करा

3 उत्तम लेखक होण्यासाठी उत्तम वाचक होणे आवश्यक असते, याबाबत तुमचे विचार स्पष्ट करा–

**प्र 5 ङः– वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्य पुन्हा लिहा :– (5X1=5)**

**( नौबत झडणे/स्वप्न साकार करणे/ मन लागणे/आर्जव करणे/ तथ्य असणे)**

1 गुरुजींच्या चांगल्या शिकवणीमुळे सुजलला अभ्यास आवडू लागला.

2 शिवाजी महाराजांच्या काळात सर्वत्र स्वराज्याचा विजय साजरा होत होता.

3 कलेक्टर बनून रामने बाबांचे स्वप्न पूर्ण केले. .

4 आपण ऐकलेली बातमी खरी आहे का हे तपासून बोलावे.

5 रस्त्यावर भिकारी पैश्यांसाठी लोकांना विनंती करत होता.

**प्र 6 अ :– (अ) एका वाक्यात उत्तरे लिहाः– ( कोणतेही चार ) (4X1=4)**

1 हरिणी चिंतेत का आहे ?

2 मातीचे काय मंगलमय व्हावे ?

3 फुलामुलातून कोण हसते ?

4 कवी नारायण सुर्वे यांनी शाळा कशास म्हटले आहे ?

5 हात कोणाकडे गहाण राहिले असे कवी म्हणतात ?

**प्र 6 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :–(कोणतेही चार) (4X1=4)**

1 कधी माना उंचावलेले कधी ---- झालेले पाहिले.

2 दीनदुबळयांचे असे तुला ------ औक्षण.

3 घराघरातून जन्म घेतसे तेज नवा ----------.

4 डोळयातील आसवांची ---- पाजळावी

5 पिली पडताचि ---------

**प्र 6 क) खालील काव्यपंक्तींचे संदर्भासहित स्पष्टीकरण कराः–(कोणतेही एक) (1X3=3)**

1 शेकडो वेळा चंद्र आला।तारे फुलले,रात्र धुंद झाली।
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.

किंवा

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पिढीचे,नव्या युगाचे स्वप्न करू साकार

**प्र 7 अ स्थूलवाचन :– एका वाक्यात उत्तरे लिहा :– ( कोणतेही तीन ) (3X1=3)**

1 ताकास तूर न लागू देणे या वाक्प्रचाराचा अर्थ काय ?

2 धारण करणारा या अर्थाचा फारसी प्रत्यय कोणता?

3 व्युत्पत्ती कोशाच्या कार्याची जबाबदारी कोणी घेतली होती ?

4 बार्कमध्ये लेखक काय म्हणून जॉईन झाले ?

**प्र 7 (ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर 40ते 50 शब्दात लिहा :– (1X2=2)**

1 बार्क संस्था या विषयावर टिप लिहा.

2 व्युत्पत्ती कोशात शब्दाविषयी कोणती माहिती दिलेली असते ?

## विभाग– ड लेखन– (गुण 15)
## लेखन

**प्र 8 अ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा :–** **(1X6=6)**

**1 थंडीतील सकाळ**

मुद्‌देः–हिवाळा हा प्रिय ऋतू––– सकाळ सुखद––– गावाकडील सकाळ–– सर्वत्र धुके––– अधूनमधून डोंगर,झाडांचे शेंडे यांचे दर्शन––– पानांचा सडा––– सर्वत्र दव––शहरात लोक रंगीबेरंगी स्वेटर,शाल परिधान करतात–––कधी कधी जाडजूड पांघरूणात लपेटून राहण्याचा आनंद––– हवीहवीशी वाटणारी सकाळ.

**2 परीक्षा रद्‌द झाल्या तर .............**

**मु**द्‌दे :– परीक्षेचा त्रास––– परीक्षा रद्‌द व्हावी–––परिणाम –––योग्य व अयोग्य ठरवणे अशक्य––––परीक्षा हवीच ––––योग्य क्षेत्रात योग्य व्यक्तींची निवड.

**3 पडक्या किल्ल्याचे मनोगत**

मुद्‌दे :– किल्ल्याला भेट देण्याचे कारण––––किल्ल्याची आजची अवस्था –––किल्ल्यांचा काळ –––कामगिरी व कोणाकोणाच्या अंमलाखाली किल्ला होता ––––सध्याचा काळ आणि लोकांकडून झालेली अवहेलना.

**प्र 8 (ब) मुद्‌दयावर आधारित गोष्ट लिहा. (शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक)** **(1X5=5)**

शेतकरी –––– रोज एक सोन्याचे अंडे देणारी कोंबडी–––शेतक–याची स्थिती सुधारणे–––शेतक–याला सोन्याची हाव ––––––त्याने कोंबडीला मारणे–––पोटात एकही अंडे नसणे–––पश्चाताप –तात्पर्य .

**किंवा**

एका शाळेत एक शिक्षक –––गणित विषय शिकवत–––घरचा अभ्यास देणे–––एक कठीण गणित घरून सोडवून आणण्यास सांगणे–––दुस–या दिवशी शिक्षक गणित तपासतात–––फक्त एकच विदयार्थाचे गणित बरोबर ––– शिक्षक त्याला शाबासकी देतात–––तो विदयार्थी रडू लागतो––सर्व मुलांना आश्चर्य––विदयार्थांचे उत्तर गणित मी सोडवले नाही मला शाबासकी नको. शिक्षकांना आनंद होतो ते समजूत घालतात –––तात्पर्य.

**प्र 8 (क) पत्र लेखन :– ( कोणतेही एक )** **(1X4=4)**

तुम्ही साक्षी/सार्थक दांडेकर ,कुमठेकर मार्ग,पेरूगेट,सांगली–404430 रहिवाशी आहात.तुमच्या भागातील कचराकुंडीतील कचरा खूप दिवस उचललेला नाही तो रस्त्यावर पसरला आहे. त्यामुळे सगळीकडे दुर्गंधी पसरलेली आहे ,यासंबंधी महापालिकेच्या स्वच्छता अधिका–याकडे तक्रार करणारे पत्र लिहाः–

**किंवा**

रिया/रजत प्रधान, विदयार्थी प्रतिनिधी,नेहरू विदयालय,सोलापूर येथून शाळेच्या मैदानावर केलेले अतिक्रमणाबाबत तक्रार करणारे पत्र प्रकाश मोरे,नगरसेवक,महानगरपालिका सोलापूर यांना पत्र लिहा :–

**:::::::::::::::::::::: समाप्त :::::::::::::::::::::::::::**